महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग

# संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय

४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.

दूरध्वनी क्र. ०२२-२७५६१८२४/ टोल फ्री क्र. ०१९ २२२१८०० Website : www.mahaawaas.org

Email ID : directoriayruralhousing@gmail.com Maha Awaas :

**क्र. राव्यक-ग्रागृ/आय.ई.सी./पुरस्कार/४३/२०२६** **दि. १६/०१/२०२६**

**प्रति,**

**मा. विभागीय आयुक्त,**
**पुणे विभाग, पुणे**

**विषय:-** **'महा आवास अभियान २०२४-२५' मधील उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था / व्यक्तींना 'महा आवास अभियान' पुरस्कार वितरण व पुरस्कार निवड अहवालाबाबत.**

**संदर्भ:-** १. ग्राम विकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांकः प्रआयो-२०२४/प्र.क्र.१६१/योजना-१०, दिनांक ०१ जानेवारी, २०२५
२. या कार्यालयाचे पत्र क्र.राव्यक-ग्रागृ/आय.ई.सी./पुरस्कार/११०७/२०२५, दि.१५/०५/२०२५
३. या कार्यालयाचे पत्र क्र.राव्यक-ग्रागृ/आय.ई.सी./पुरस्कार/१३३९/२०२५, दि.१२/०६/२०२५
४. या कार्यालयाचे पत्र क्र.राव्यक-ग्रागृ/आय.ई.सी./पुरस्कार/१७०२/२०२५, दि.०६/०८/२०२५

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयांन्वये 'महा आवास अभियान-२०२४-२५' मध्ये राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे मूल्यमापन करुन उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व व्यक्तींना 'महा आवास अभियान पुरस्कार' देऊन गौरव करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

तरी उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयान्वये तालुकास्तरीय/जिल्हास्तरीय/विभागस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती यांनी विहीत मुदतीत मूल्यमापन करुन निवड केलेल्या पुरस्कार विजेत्यांचा अहवाल त्यांना दिलेल्या कालावधीच्या अंतिम दिवसापर्यंत त्यांच्या वरिष्ठ पातळीवरील समितीकडे सादर करावयाचा आहे.

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. २, ३ व ४ अन्वये ग्रामपंचायत, तालुका व जिल्हा स्तरावरील महा आवास अभियान पुरस्कार निवडण्यासाठी संबंधित स्तरावरील अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समितीने विहीत मुदतीत मूल्यमापनाची सर्व कार्यवाही पूर्ण करून दिनांक २८ मे, २०२५ रोजी ग्रामपंचायतस्तरीय, दिनांक ३० जुन, २०२५ रोजी तालुकास्तरीय व १५ ऑगस्ट, २०२५ रोजी जिल्हास्तरीय 'महा आवास अभियान पुरस्कार' वितरीत करण्याचे कळविले होते. त्यानुसार ग्रामपंचायतस्तरीय, तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय पुरस्कार वितरण करणे प्रलंबित असलेल्या संबंधित यंत्रणेला तात्काळ कार्यवाही करण्याचे सुचित करावे.

**विभागस्तरावरील महा आवास अभियान पुरस्कार निवडण्यासाठी विभागस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समितीने विहीत मुदतीत कार्यवाही पूर्ण करुन विभागस्तरावर प्रजासत्ताक दिनी दिनांक २६ जानेवारी, २०२६ रोजी 'महा आवास अभियान पुरस्कार' वितरण कार्यक्रम आयोजित करावयाचा आहे. तसेच राज्यस्तरीय महा आवास अभियान २०२४-२५ पुरस्कारासाठी आपल्या विभागातील पुढील तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे पुरस्कारांची शिफारशींसह माहिती या कार्यालयास दिनांक २६ जानेवारी, २०२६ पर्यंत सादर करावी, ही विनंती.**

| | | |
|---|---|---|
| | **महा आवास अभियान २०२४-२५ पुरस्कार** | |
| | **प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण** | |
| १ | विभागातील सर्वोत्कृष्ट जिल्हे | प्रथम, व्दितीय व तृतीय |
| २ | विभागातील सर्वोत्कृष्ट तालुके | प्रथम, व्दितीय व तृतीय |
| ३ | विभागातील सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायती | प्रथम, व्दितीय व तृतीय |
| ४ | विभागातील सर्वोत्कृष्ट बहुमजली इमारत | प्रथम, व्दितीय व तृतीय |
| ५ | विभागातील सर्वोत्कृष्ट गृहसंकुल | प्रथम, व्दितीय व तृतीय |
| ६ | विभागातील सर्वोत्कृष्ट बहुमजली गृहसंकुल (हाऊसिंग अपार्टमेंट) | प्रथम, व्दितीय व तृतीय |
| | **राज्य पुरस्कृत आवास योजना** | |
| १ | विभागातील सर्वोत्कृष्ट जिल्हे | प्रथम, व्दितीय व तृतीय |
| २ | विभागातील सर्वोत्कृष्ट तालुके | प्रथम, व्दितीय व तृतीय |
| ३ | विभागातील सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायती | प्रथम, व्दितीय व तृतीय |
| ४ | विभागातील सर्वोत्कृष्ट बहुमजली इमारत | प्रथम, व्दितीय व तृतीय |
| ५ | विभागातील सर्वोत्कृष्ट गृहसंकुल | प्रथम, व्दितीय व तृतीय |
| ६ | विभागातील सर्वोत्कृष्ट बहुमजली गृहसंकुल (हाऊसिंग अपार्टमेंट) | प्रथम, व्दितीय व तृतीय |

महा आवास अभियान पुरस्कारसाठी विभागस्तरावरील विजेत्यांना गौरव करताना द्यावयाचे प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्हाचे डिझाईन सोबत देण्यात येत आहे. या प्रशस्तीपत्रकाची छपाई A4 आकारामध्ये व सन्मानचिन्ह १२ × १० इंच या आकारामध्ये करून यासाठी येणारा खर्च विभागस्तरावरील उपलब्ध प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रशासकीय निधीतून भागविण्यात यावा. तसेच राज्यस्तरीय महा आवास अभियान २०२४-२५ पुरस्कार वितरण कार्यक्रमाबाबत स्वतंत्र पत्राव्दारे कळविण्यात येईल.

**सोबत :- विभागस्तरावरील विजेत्यांसाठी प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्हाचे डिझाईन**

(डॉ. राजाराम दिघे)
**संचालक,**
**ग्रामीण गृहनिर्माण,**
**महाराष्ट्र राज्य**

**प्रत :-**

**१. मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांना माहितीस्तव सविनय सादर.**

**२. कार्यकारी अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (विभागातील सर्व) यांनी आपल्या जिल्हयातील वरील तक्त्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे तालुके, ग्रामपंचायती, सर्वोत्कृष्ट बहुमजली इमारती, सर्वोत्कृष्ट गृहसंकुले, बहुमजली गृहसंकुले, कॉर्पोरेट संस्था, स्वयंसेवी संस्था आणि सहकारी संस्था यांचे सहकार्याने व अभियानात इतर नाविन्यपूर्ण उपक्रमाव्दारे जिल्ह्यात केलेले काम याबाबतची माहिती विभागस्तरीय सनियंत्रण व मुल्यमापन समितीकडे तात्काळ सादर करावी, ही विनंती.**

**३. अप्पर आयुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे यांना माहिती व कार्यवाहीस्तव.**

**४. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (विभागातील सर्व) यांना माहिती व कार्यवाहीस्तव**

ग्राम विकास व पंचायत राज विभाग

राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण

# महा आवास अभियान २०२४-२५

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण / राज्य पुरस्कृत ग्रामीण आवास योजना

## विभागस्तरीय पुरस्कार

## प्रशस्तीपत्र

जिल्हा परिषद ---------------------------------, जिल्हा ------------------------------- यांना

**'महा आवास अभियान २०२४-२५'** अंतर्गत विविध उपक्रमांच्या माध्यमातून **'सर्वोत्कृष्ट जिल्हा'** या प्रकारात **प्रथम/द्वितीय/तृतीय** क्रमांकाच्या पुरस्कारासाठी प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात येत आहे.

श्री./श्रीमती --------------------------

विभागीय आयुक्त

पुणे विभाग, पुणे

दिनांक / /२०२६





ग्राम विकास व पंचायत राज विभाग

राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण

# महा आवास अभियान २०२४-२५

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण / राज्य पुरस्कृत ग्रामीण आवास योजना

## विभागस्तरीय पुरस्कार

## प्रशस्तीपत्र

पंचायत समिती --------------------------------, तालुका -----------------, जिल्हा -------------- यांना

'महा आवास अभियान २०२४-२५' अंतर्गत विविध उपक्रमांच्या माध्यमातून 'सर्वोत्कृष्ट तालुका' या प्रकारात प्रथम/द्वितीय/तृतीय क्रमांकाच्या पुरस्कारासाठी प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात येत आहे.

श्री./श्रीमती -------------------------

विभागीय आयुक्त

पुणे विभाग, पुणे

दिनांक / /२०२६



ग्राम विकास व पंचायत राज विभाग

राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण

# महा आवास अभियान २०२४-२५

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण / राज्य पुरस्कृत ग्रामीण आवास योजना

## विभागस्तरीय पुरस्कार

## प्रशस्तीपत्र

ग्रामपंचायत --------------------------------, तालुका -----------------, जिल्हा -------------- यांना **'महा आवास अभियान २०२४-२५'** अंतर्गत विविध उपक्रमांच्या माध्यमातून **'सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत'** या प्रकारात **प्रथम/द्वितीय/तृतीय** क्रमांकाच्या पुरस्कारासाठी प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात येत आहे.

श्री./श्रीमती -------------------------

विभागीय आयुक्त

पुणे विभाग, पुणे

दिनांक / /२०२६



ग्राम विकास व पंचायत राज विभाग

राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण

# महा आवास अभियान २०२४-२५

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण / राज्य पुरस्कृत ग्रामीण आवास योजना

## विभागस्तरीय पुरस्कार

## प्रशस्तीपत्र

ग्रामपंचायत -----------------------------, तालुका --------------------, जिल्हा ----------------- यांना
**'महा आवास अभियान २०२४-२५'** अंतर्गत **'सर्वोत्कृष्ट बहुमजली इमारत'** या प्रकारात **प्रथम/द्वितीय/तृतीय** क्रमांकाच्या पुरस्कारासाठी प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात येत आहे.

श्री./श्रीमती -------------------------

विभागीय आयुक्त

पुणे विभाग, पुणे

दिनांक / /२०२६



ग्राम विकास व पंचायत राज विभाग

राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण

# महा आवास अभियान २०२४-२५

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण / राज्य पुरस्कृत ग्रामीण आवास योजना

## विभागस्तरीय पुरस्कार

## प्रशस्तीपत्र

**ग्रामपंचायत** -----------------------------, तालुका --------------------, जिल्हा ----------------- यांना **'महा आवास अभियान २०२४-२५'** अंतर्गत **'सर्वोत्कृष्ट गृह संकुल'** या प्रकारात **प्रथम/द्वितीय/तृतीय** क्रमांकाच्या पुरस्कारासाठी प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात येत आहे.

श्री./श्रीमती --------------------------

विभागीय आयुक्त

पुणे विभाग, पुणे

दिनांक / /२०२६



ग्राम विकास व पंचायत राज विभाग

राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण

# महा आवास अभियान २०२४-२५

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण / राज्य पुरस्कृत ग्रामीण आवास योजना

## विभागस्तरीय पुरस्कार

## प्रशस्तीपत्र

**ग्रामपंचायत ------------------------------,** तालुका ---------------------, जिल्हा ------------------ यांना **'महा आवास अभियान २०२४-२५'** अंतर्गत **'सर्वोत्कृष्ट बहुमजली गृह संकुल (हाऊसिंग अपार्टमेंट)'** या प्रकारात **प्रथम/द्वितीय/तृतीय** क्रमांकाच्या पुरस्कारासाठी प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात येत आहे.

**श्री./श्रीमती --------------------------**

विभागीय आयुक्त

पुणे विभाग, पुणे

दिनांक / /२०२६

